
बहर
'छात्र प्रबोधन' मधील
कुमार कथांचा संग्रह

# छात्र प्रबोधन

- *ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठीचे मासिक*

  * कुमारांच्या भावविश्वाशी निगडित कथा, कविता, ललित लेख याचबरोबर ज्ञान-विज्ञान-कृती अशा सर्वांगीण विषयांना स्पर्श करणारे मासिक !
  * प्रारंभ शके १९१४ (इ.स.१९९२)

- नामवंत लेखकांच्या साहित्यकृतींनी समृद्ध मासिक !

  * लागोपाठ ५वर्षे उत्कृष्ट दिवाळी अंकांचे विविध पुरस्कार.
  * महाराष्ट्र, बेळगाव, गोवा मिळून ३५ शहरे आणि ७० तालुके यांमध्ये मिळून ४०,००० पेक्षा अधिक वाचक.
  * स्वत:ची अक्षर जुळणीची सुस ा संगणकीय यंत्रणा.

- *स्थानिक स्वयंसेवी कार्यकर्त्यांद्वारा कार्यरत केंद्रे*

  * स्थानिक स्वयंसेवी कार्यकर्त्यांद्वारा कार्यरत केंद्रे
  * ४० ठिकाणी वितरण केंद्रे

- **वर्गणी**

  वार्षिक : रु. १८०/- द्वैवार्षिक : रु.३४०/-

  त्रैवार्षिक : रु. ५००/- दशवार्षिक : रु.१५००/-

**निव्वळ मासिक नव्हे !...**

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

- *मासिकाच्या सभासदांसाठी विविध उपक्रम*

  * ग्रामीण जीवन परिचय शिबिर व गिरिभ्रमण.
  * नेतृत्व प्रशिक्षण शिबिर, अभ्यास शिबिर.
  * अभ्याससहली, सायकल सहली.
  * व्य तिमत्त्व विकसन शिबिर, विज्ञान शिबिर.
  * साप्ताहिक उपक्रम, सहली, प्रासंगिक मेळावे.
  * राखी, शुभेच्छापत्र निर्मिती व विक्री उपक्रम.

- **विविध शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन**

  आतापर्यंत २४ पुस्तके व तीन ध्वनिफितींची निर्मिती.

**ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोग व प्रणालीच्या विस्ताराचे, प्रसाराचे एक माध्यम !**

# बहर

‘छात्र प्रबोधन’मधील निवडक कुमारकथांचा संग्रह

संपादन
शैलजा देशमुख

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०.

**बहर**
(‘छात्र प्रबोधन’ मधील
निवडक कुमारकथांचा संग्रह)

**प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

**अक्षर जुळवणी**
छात्र प्रबोधन, पुणे ३०

**मुखपृष्ठ पारदर्शिका**
प्रा.प्र.के.घाणेकर

**आतील चित्रे व सजावट**
श्री. भास्कर सगर

© स्वामित्व प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रथम आवृत्ती :** सौर श्रावण, शके१९२२,ऑगस्ट २०००

**किंमत**
रुपये ५०/-

**Bahar**
(Compilation of stories selected from 'Chhatra Prabodhan')

# प्रस्तावना

लहानपणापासून मुलांना कथा ऐकणं, वाचणं खूप आवडतं. ही सहजप्रवृत्ती आहे. अगदी सुरुवातीला, काऊ-चिऊ, वाघ, सिंह, कोल्हा पशु-पक्षी इत्यादी, कल्पनेतील पऱ्या-राक्षस यात रमणारं बालमन, शिकत शिकत, अनुभव घेत मोठं व्हायला लागतं.आपल्या भावविश्वाशी जुळणारं वाङ्मय ते शोधायला लागतं.

सतत वेगाने विस्तारणारं मुलांचं भावविश्व अनुभवातून संपन्न होऊ पाहातं. बाल्यावस्थेतून किशोर-कुमार अवस्थेकडे झुकणाऱ्या मुलाला सगळं अवकाश आपल्या हाती आल्यासारखं वाटतं. सभोवतालच्या माणसांचे भावबंध कळायला लागतात. चांगल्या-वाईटाचं भान येऊ लागतं. ना धड बाल, ना धड युवा अशा सीमारेषेवरील कुमारांचं मन खूप संवेदनशील असतं. ते चटकन प्रतिक्रिया देतं. या टप्प्यावर कथेच्या माध्यमातून त्यांचं भावविश्व अधिक समृद्ध होऊ शकतं अन् ही प्रक्रियाही खूप आनंद देणारी असते.

'छात्र प्रबोधन' हे मासिक खास कुमारांसाठी प्रकाशित केले जाते. त्यामुळे त्यातील वाङ्मय हे जाणीवपूर्वक, खास कुमार वयोगट डोळ्यांसमोर ठेवून लिहिलेले आहे. मासिकाला आठ वर्षे पूर्ण झाल्याच्या टप्प्यावर, मागे वळून पाहाताना असं जाणवलं, की कुमारांसाठी सुंदर कथांचा खूप मोठा खजिना आपल्याजवळ आहे. तो एकत्रितपणे वाचकांना उपलब्ध करून द्यावा; भावी काळातील कुमार वाचकांसाठी हे अनमोल साहित्य, पुस्तकरूपाने एकत्रित केलेले असावे; या दुहेरी हेतूने 'छात्र प्रबोधन'मध्ये प्रकाशित झालेल्या कथांपैकी निवडक कथांचे छोटे चार कथासंग्रह अगदी अल्प किंमतीत उपलब्ध करून देत आहोत. त्यातील 'दरवळ', 'मृद्‌गंध' व 'मोहोर' हे कथासंग्रह आपण वाचलेच असतील. याच मालिकेतील 'बहर' हा चौथा कथासंग्रह आमच्या वाचकांसमोर ठेवताना, आम्हाला खूप आनंद होत आहे.

लघुकथा या वाङ्मयप्रकारातील विविध प्रकार, विविध विषय, वेगवेगळ्या लेखकांच्या शैलींमधील वैविध्य, या सर्वांची कुमारवाचकांना ओळख व्हावी यादृष्टीने कथासंग्रहात, साहसकथा, विज्ञानकथा, भावकथा, अनुवादित कथा, रूपांतरित कथा, वन्यजीवनावर आधारित कथा, ऐतिहासिक कथा, सामाजिक आशयाच्या कथा, अशा विविध प्रकारच्या कथा येथे समाविष्ट केल्या आहेत.

एका छोट्या मुलाचे साहस, वाघीण बायो आणि दोडक्याचा लाडका या तीनही साहस कथा आहेत. पावसामुळे आलेल्या पुरात रात्रभर अडकून पडलेल्या रॉडीने, संकटांवर मात करत स्वत:चा व आईचा जीव कसा वाचविला, त्याची कहाणी 'एका छोट्या मुलाचे साहस' या कथेत मोठ्या वेधकपणे मांडली आहे; तर 'वाघीण बायो' या कथेत वाघाच्या तावडीत सापडलेल्या आपल्या शेळीला मोठ्या हिमतीनं, जिवंत सोडविणाऱ्या बायोची गोष्ट आहे. कधी कधी शक्तीपेक्षा युक्तीच कशी आपल्याला संकटातून सोडवते, याची प्रचीती आपल्याला 'दोडक्याचा लाडका' या कथेतून येते. संकटात प्रसंगावधानाने सलील त्याच्या काकूची कशी मदत करतो, याची ही कहाणी आहे.

'एकट्याची होळी' या कथेत छोट्याशा भांडणावरून, चाळीतील मुलांनी मुद्दाम होळीची वर्गणी मागितली नाही व त्यामुळे जम्याने एकट्याची वेगळी होळी कशी केली ते मांडलं आहे. 'सुवर्णरेखाची रोजनिशी' व 'सुट्टी' या दोन्ही कथांमध्ये लहान मुलांचे भावविश्व सुंदररितीने रेखाटले आहे. 'सुट्टी'ही मूळ रवीन्द्रनाथांच्या कथेचा उत्तम अनुवाद आहे.

'सोनेरी संध्याकाळ' ही मुलांचे व अध्यापकांचे नाजुक भावबंध टिपणारी कथा आहे. निसर्गाचा समतोल जर मानवाने बिघडवला तर त्याचे गंभीर परिणाम, संपूर्ण मानव जातीलाच भोगावे लागतील, हे 'समतोल' या विज्ञान कथेतून सांगायचा प्रयत्न केला आहे.

'प्रायश्चित' हीसुद्धा हिंदीतून अनुवादित केलेली कथा आहे. अंधश्रद्धेवर आघात करणारी उपहासगर्भ पण तरीही खुसखुशीत अशी ही कथा आहे.

आधुनिक काळात, सोवळं-ओवळं पाळणाऱ्या आजीला जगणं अवघड होतं. म्हणून ती भरलं घर सोडून गावी जातो. पण त्या शहरी वातावरणाची सवय झालेल्या आजीला तिथे करमत नाही, नातवंडांशिवाय राहाता येत नाही. मग आजी परत गावी येते, याची कहाणी 'चिमाआजी' मधे मांडली आहे.

'लाल शर्ट निळा रूमाल' ही कथा परकीय कथेच्या कल्पनेवर आधारित असली तरी तिचे रूपांतर हे उत्कंठावर्धक व छान असे केले आहे.

एकूण या कथांचे वैशिष्ट्य हे की कुमारांचे भावविश्व, त्यांना काय आवडते हे ध्यानात घेऊन अनेक प्रथितयश, तसेच ताज्या दमाच्या नव्या लेखकांनी लिहिलेल्या सुंदर कथा या संग्रहात तुम्हांला वाचायला मिळतील. मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास, भावविश्वाची व अनुभवविश्वाची समृद्धी, भोवतालच्या जगाचे आकलन, सहसंवेदनाजागृती, त्यातून भावकोषसमृद्धी असे अनेक परिणाम या कथा साधतात. दूरदर्शनवरील नवनव्या वाहिन्या, इतर दृक्श्राव्य माध्यमे यांच्या विळख्यात अडकू पाहणाऱ्या मुलांच्या मनाचा विकास व्हावा, त्यांच्या अभिरुचीला चांगले वळण लागावे, लहान वयातच चांगले काय नि वाईट काय याचा नीर-क्षीर-विवेक त्यांना करता यावा, भावी आयुष्यात साहित्याचा आस्वाद घेता यावा, पुस्तकांची साथसंगत वाढावी या सर्वांपेक्षाही आनंदाचे निधान सापडावे या हेतूंनी हा कथासंग्रह प्रकाशित करीत आहोत. या सुंदर कथांचा दरवळ सर्वत्र पसरावा आणि चिरकाल टिकावा ही सदिच्छा! मुलांना चांगले व आवडेलसे काय वाचायला द्यावे हा विचार पालक-शिक्षकांना पडत असतो. या कथासंग्रह-मालिकेच्या रूपाने सुंदर कुमारकथांचे दालन आम्ही आपल्यासाठी खुले करीत आहोत !

अंकातील दर्जेदार कथांचे पुस्तकरूपाने संकलन करण्यासाठी, सर्व कथाकारांनी उत्स्फूर्तपणे परवानगी दिली व आम्हाला प्रोत्साहन दिले, त्याबद्दल सर्वांचे आम्ही ऋणी आहोत !

**सौर श्रावण २४, शके १९२२** **– शैलजा देशमुख**
**१ सप्टेंबर २०००.**

# कथाक्रम


| | | |
|---|---|---|
| १. सुवर्णरेखाची रोजनिशी | - लीला दीक्षित | २ |
| २. एका छोट्या मुलाचे साहस | - विजय देवधर | १२ |
| ३. चिमाआजी | - ज्योत्स्ना देवधर | २३१ |
| ४. वाघीण बायो | - हरिहर आठलेकर | २८ |
| ५. प्रायश्चित्त | - चारुता पुराणिक | ३४ |
| ६. सोनेरी संध्याकाळ | - शैलजा देशमुख | ४१ |
| ७. अस्ति कश्चित् वाङ्‌विशेष | - सुलभा जोगळेकर | ४६ |
| ८. लाल शर्ट निळा रुमाल | - सुहासिनी देशपांडे | ५४ |
| ९. दोडक्याचा लाडका | - शकुंतला फडणीस | ६० |
| १०. एकट्याची होळी | - गणेश दिघे ६६ | ६६ |
| ११. सुट्टी | - मृणालिनी गडकरी | ७२ |
| १२. समतोल | - मुकुंद जोगळेकर | ७९ |

## ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक प्रकाशने

| | |
|---|---|
| **१.व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत** | ₹ ७० |
| (सर्वांगीण व्यि तमत्त्व विकासासाठी समग्र मांडणी) | |
| **२.प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** | ₹ ५० |
| (ललित लेखन कसे करावे ? याचा मूलमंत्र देणारे पुस्तक) | |
| **३.कल्पक बनू या** | ₹ ६० |
| **Be creative** | ₹ १०० |
| (कल्पनाश ती वाढविण्याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक) | |
| **४. रूप पालटू शिक्षणाचे भाग १** | ₹ ३० |
| (ज्ञान प्रबोधिनीतील शैक्षणिक भूमिका व नमुना उपक्रमांची रूपरेषा) | |
| **५.त्रिमितीची किमया** | ₹ ७५ |
| **3D Magic** | ₹ ८० |
| (भूमितीय आकृत्यांमधून त्रिमितीय आकृत्या साकार करायला शिकविणारे पुस्तक) | |
| **६.सामाजिक जाणीव संवर्धन प्रयोगातुन–प्रशिक्षणाकडे** | ₹ ८० |
| (विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव वाढविण्यासाठी कृतिपुस्तिका) | |
| **७.असे घटते सुंदर अक्षर** | ₹ १५ |
| (हस्ताक्षर सुधारण्यासाठी कृतिपुस्तिका) | |
| **८.हसत खेळत बुद्धिविकास** – भाग १ | ₹ १३० |
| **हसत खेळत बुद्धिविकास** – भाग २ | ₹ १५० |
| **Enhancement of Intelligence Through Play** | ₹ १५० |
| (बुद्धीच्या विविध पैलूंसाठी विविध खेळ) | |
| **९. बुद्धिवैभव**(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक) | ₹ २० |
| **Glory of Intelligence** | ₹ ३० |
| **१०.पंचकोश विकसनातून शिक्षण** | ₹ ८० |
| (भारतीय शिक्षण पद्धतीच्या प्रयोगाची मांडणी) | |
| **११. गीता–गीताई** | ₹ १० |
| (एक श्लोक गीतेचा व एक श्लोक गीताईचा) | |
| **१२. आश्वासक पालकत्व** | ₹ ८० |
| (मुलामुलींच्या जडणघडणीसाठी पालकांना उपयु त) | |
| **१३. ज्ञान प्रबोधिनी खंड – ४** | ₹ १०० |
| **१४. छात्र प्रबोधन दशवार्षिक संकलन**(डी. व्ही. डी.) | ₹ १०० |

---

**छात्र प्रबोधन** (कुमारांसाठी मासिक) **वार्षिक वर्गणी :** ₹ १८०

**वितरक :** **छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
☎ (०२०) २४२०७ १७४/१७५
**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org

'ज्ञान प्रबोधिनी'द्वारा कुमारांसाठी प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'छात्र प्रबोधन' मासिकातील, मनात रेंगाळत राहिलेल्या सुंदर कथांचा सुगंध 'दरवळ', 'मृद्‌गंध', 'बहर' व 'मोहोर' या चार पुस्तकांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचवत आहोत.

'एका छोट्या मुलाचे साहस, वाघीण बायो आणि दोडक्याचा लाडका' या साहसी मुलांच्या कथा, 'एकट्याची होळी, सुवर्णरेखाची रोजनिशी, सुट्टी, सोनेरी संध्याकाळ' या मुलांच्या भावविश्वाचे चित्रण करणाऱ्या कथा,' लाल शर्ट निळा रुमाल' ही उत्कंठावर्धक कथा, अशा वैविध्यपूर्ण कथांनी संपन्न असा हा कथासंग्रह, कुमारवाचकांना नक्कीच आवडेल असा आहे.

खास कुमारांसाठी संग्रहित केलेल्या या कथांचा 'बहर' वाचकांच्या मनात सदैव रेंगाळत राहील, हा विश्वास आहे.

